**पोलीस उप आयुक्त, परिमंडळ १, मुंबई.**

**-: प्रेस नोट :-** **दिनांक १४/०९/२०२३**

**कुलाबा पोलीस ठाणे येथील जबरी चोरीच्या गुन्हयामध्ये आरोपी अटक करून परदेशी महिला नागरीकाची चोरीस गेलेली मालमत्ता हस्तगत करून सदर परदेशी महिला नागरीक यांना पुन्हा सुपूर्त केल्याबाबत.**

फिर्यादी श्रीमती रहिमा सालीम अलवार्दी वय ४७ वर्ष हे टांझानिया देशातील नागरिक असून ते त्यांचे पतीचे कामानिमित्त कुटूंबासह मुंबई आले असता, दिनांक ०१.०६.२०२३ रोजी २१:०० वा ते २१:१० चे सुमारास हॉटेल ताज पॅलेसचे मागील रोड, कुलाबा, मुंबई येथे एका अनोळखी इसमाने त्यांचे गळ्यातील काळ्या रंगाची पर्स हिसकावून मोटार सायकलवर बसून पळून गेले होते. फिर्यादी यांनी घटनेबाबत कुलाबा पोलीस ठाणेस रिपोर्ट केल्यावरून गु.र.क्र. १४१/२०२३, कलम ३९२, ३४ भा.द.वि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सदर गुन्ह्याच्या तपासादरम्यान घटनास्थळाचे फुटेज व मिळालेल्या गुप्त बातमी वरून १) मोह. अरफात वज्रुद्दिन चौधरी वय २६ वर्ष, २) सैफ रज्जाक खान वय २१ वर्ष व ३) फहीम अयाज शेख वय २६ वर्ष या तीन आरोपिताना अटक करून त्यांचेकडून एकूण २,३७,६००/- रु. व २२०० अमेरिकन डॉलर्स (भारतीय चलनातील किमती १,९५,८००/- रु.) व आय फोन १४ प्रो मोबाईल किमती ७०,०००/- रु. असा एकूण ५,०३,४००- रु. चा चोरी गेलेला मुद्देमाल हस्तगत करण्यात आलेला आहे.

फिर्यादी हे परदेशी नागरिक असल्याने त्यांना त्यांचा मुद्देमाल परत मिळणेकरिता कुलाबा पोलीस ठाणेकडून मा. न्यायालयात सतत पाठपुरावा करून मा. न्यायालयाचे आदेशाने एकूण ५,०३,४००/- रु. किमतीचा मुद्देमाल मा. पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-१, मुंबई शहर याचे हस्ते फिर्यादी महिला श्रीमती रहिमा सालीम अलवार्दी यांना दिनांक १३/०९/२०२३ रोजी परत करण्यात आला आहे.

सदरची कामगिरी डॉ. अभिनव देशमुख, अपर पोलीस आयुक्त, दक्षिण प्रादेशिक विभाग, मुंबई, डॉ. प्रविण मुंढे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-१,मुंबई, श्री. शशिकिरण काशिद, सहा.पोलीस आयुक्त, कुलाबा विभाग व विजय हातिसकर, वपोनि, कुलाबा पोलीस ठाणे यांच्या मार्गदर्शनाखाली सहा. पो. निरीक्षक स्वप्निल वाघ, पो.ह. मोहिते, पोशि भोसले, पोशि अत्रे, पोशि पुरे या पथकाने केली आहे.

Scanned with CamScanner



Scanned with CamScanner